# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/01/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## पोस्टे कळमेश्वर अंतर्गत हुक्का पार्लरवर धाड
## विशेष पथकाची कामगिरी

दिनांक २८/०१/२०२४ चे २२.५० वा. ते २३.५५ वा. दरम्यान मा. पोलीस पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथक यांना गोपनीय सुत्राद्वारे माहिती मिळाली की, पोस्टे कळमेश्वर अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा गोंडखैरी हिंगणा टि–पॉईंट येथे बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरू आहे, अशा मिळालेल्या माहिती वरून विशेष पथकाने ॲटमॉस्पीअर रेस्टॉरंन्ट येथे रेड केली असता यातील रेस्टॉरंन्ट मालक राजा खान यांनी मॅनेजर व वेटर यांचे मदतीने बेकायदेशिररित्या रेस्टॉरंन्ट/हुक्का पार्लर सुरू ठेवुन हॉटेल मधील लोकांना हुक्का पिण्यासाठी उपलब्ध करून दिल्याने तसेच आरोपी नामे– १)हॉटेल ॲटमॉस्पीअर मॅनेजर संघदीप मोरेश्वर मेश्राम वय ४१ वर्ष रा. भिवसनखोरी ढाबा नागपुर, २) हॉटेल ॲटमॉस्पीअर वेटर आकाश कोमल चव्हाण वय २८ वर्ष रा. खैरी पन्नासे हिंगणा नागपुर, ३) हॉटेल ॲटमॉस्पीअर मालक मोहम्मद असलम उर्फ राजा अस्फाक खान वय ४८ वर्ष रा. बोरगाव दिनशा फॅक्टरीजवळ गिटटीखदान नागपुर यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरूद्ध कलम ४ अ, २१ अ सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने(जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम,२००३ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच मौजा गोंडखैरी हिंगणा टि–पॉईंट येथील वंडर्स ऑफ वर्ल्ड रेस्टॉरंन्ट येथे रेड केली असता यातील रेस्टॉरंन्ट मालक वासवानी यांनी मॅनेजर व वेटर यांचे मदतीने बेकायदेशिररित्या रेस्टॉरंन्ट/हुक्का पार्लर सुरू ठेवुन हॉटेल मधील लोकांना हुक्का पिण्यासाठी उपलब्ध करून दिल्याने आरोपी हॉटेल वंडर्स ऑफ वर्ल्ड मॅनेजर संकेत दिवाकर जिवतोडे वय ३१ वर्ष रा. तिष्टी ता. कळमेश्वर, २) हॉटेल वंडर्स ऑफ वर्ल्ड वेटर हर्ष किशोर सोमकुंवर वय १९ वर्ष रा हिलटॉप पांढराबोडी नागपुर, ३) हॉटेल वंडर्स ऑफ वर्ल्ड मालक हितेश हरिश वासवानी वय ४० वर्ष रा गांधी बाग अग्रसेन चौक नागपुर यांचेविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम ४अ, २१अ सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने(जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन)अधिनियम २००३ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, नागपूर ग्रा. श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथक सपोनि अमित पांडे, पोउपनि देविदास ठमके, पोहवा हरीदास चाचरकर, ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, कार्तिक पुरी, बालाजी बोरगुले, अतुल बांते,शुभम मोरोकार यांनी केली.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक
## पोलीस स्टेशन कोंढाळी यांची कारवाई

दिनांक २८/०१/२०२४ रोजी मिळालेल्या गोपनीय माहीतीनुसार पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील ग्राम खैरी येथे नाकाबंदी केली असता वेळ अंदाजे १३.३० वा. चे दरम्यान एक काळया रंगाची होंडा युनिकॉन गाडी क्रमांक एम. एच.—३२/ए.व्ही.—५०१९ ही भरधाव वेगाने खापरी गावाकडुन खैरीकडे येतांना मिळुन आली सदर वाहन चालकाला थांबविण्याचा इशारा देवुन सदर वाहने थांबविले वाहन चालकाची विचारपुस केली असता त्याने त्याचे **नाव शेख चांद शेख मेहबुब वय ३३ वर्षे, रा. वार्ड क्र. २४, बालाजी वार्ड आर्वी जि. वर्धा** असे सांगीतले सदर गाडीच्या पाठीमागे लगेच एक पांढऱ्या रंगाचा पिकअप भरधाव वेगाने व निष्काजीपणाने येतांना दिसला सदर पिकअप चालकाने पोलीस स्टाफ यांना पाहुन थोडया अंतरावर त्याचे ताब्यातील पिकअप थांबवले व त्यातील चालक हा वाहन सोडुन जोरात जंगलाच्या दिशेने पळुन गेला कोंढाळी पोलीसांनी त्याचा पाठलाग केला असता तो मिळुन आला नाही. वाहनाची पाहणी केली असता सदर गाडी टाटा एस मेगा एक्स एल क्र. एम. एच ३७/टी —१०५७ सदर वाहनामध्ये एकुण ०५ गोवंश जनावरे बैल किंमती अंदाजे ५०,०००/—रू. मिळुन आले. सदर गोवंश जनावरांना मानेला घट्ट दोराने अपुऱ्या जागेत बांधुन, निर्दयतेने कोंबलेल्या स्थितीत, त्यांचे चारापाणी तसेच औषधोपचाराची कोणतीही सोय न करता, क्रुरतेची वागणुक देवुन कत्तल करण्याचे इरादयाने आपले वाहनामध्ये वाहुन नेतांना मिळुन आले. सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनाचे व गोवंश जनावरांचे मालकीचे कोणतेही कागदपत्रे मिळुन आले नाही, सदर वाहन व गोवंश जनावरांबाबत (देखभाल) करीता असलेला इसम नामे शेख चांद शेख मेहबुब यास विचारपुस केली असता सदर गोवंश जनावरे हे त्याच्या मालकीचे असुन ही काटोल येथुन आर्वी येथे नेत असल्याचे सांगीतले तसेच पळुन गेलेल्या वाहन चालकाचे नाव साहील मंसुरी वय १९ वर्षे रा. वाल्मिकी वार्ड, आर्वी जि. वर्धा असे सांगीतले सदर जनावरांना मुक्त करुन त्यांना तात्काळ प्राथमिक औषधोपचार देवुन सदर गुन्हयातील गोवंश जनावरे अनुसया माता गोवंश समीती पारडशिंगा, ता. काटोल या ठिकाणी संरक्षणकामी जमा करण्यात आले. सदर कृत्याबाबत वाहन चालक नामे — साहील मंसुरी वय १९ वर्षे रा. वाल्मिकी वार्ड, आर्वी जि. वर्धा व गोवंश जनावर मालक शेख चांद शेख मेहबुब वय ३३ वर्षे रा. वार्ड क्र. २४ बालाजी वार्ड आर्वी जि. वर्धा यांचेविरुध्द अपराध क्रमांक ५०/२४ कलम ५अ, ९ प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, कलम ११(१) (घ) (ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६०, कलम १८४ मोटार वाहन अधिनियम कलम २७९, ३४ भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी **शेख चांद शेख मेहबुब** यास अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करित आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री बापु रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनाखाली व श्री. पंकज वाघोडे, सहायक पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार पोस्टे कोंढाळी यांचे सोबत पोलीस उपनिरीक्षक धवल देशमुख, पोहवा किशोर सावरकर, पोहवा. मोहन वाघमारे, नापोशि मंगेश म्हैसने यांचे पथकाने पूर्ण केली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक २९/०१/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोस्टे कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असता गुप्त माहिती मिळाली की, पो.स्टे. कन्हान हद्दीत बोर्डा टोल नाका येथे काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता आयशर ट्रक क्रमांक एम. एच.– ४८/सी. क्यू– ५८०८ हे संशयीत वाहन मिळुन आल्याने त्या वाहना जवळ जावुन त्याची पाहणी केली असता सदर वाहनात **आरोपी नामे–१) शिवसागर जगन्नाथ मिश्रा, वय ४१ वर्ष, रा. नालासोपारा ईस्ट पालघर मुंबई.(२) रामभरोसे रमेश यादव, वय ३३ वर्ष, रा. मुसा खांड चकिया, उत्तर प्रदेश** यांनी गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीत अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैध्यरित्या घेवुन जातांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातुन १) एकूण १० गोवंश प्रत्येक गोवंश किंमती २०,०००/–रू. प्रमाणे एकूण २,००,०००/– रुपये २) आयशर ट्रक क्रमांक एम एच ४८/सी क्यू ५८०८ किंमती १०,००,०००/–रू. रुपये एकूण गोवंश व वाहन किंमती १२,००,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून अशा एकुण १० गोवंश गो शाळेत जमा करून ट्रकचे चालक व मालक यांचे विरुद्ध कलम ११ (१)(ड) प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम ५(१)(२,) ९ प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात आली. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देवून आरोपीं विरूद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, सहायक फौजदार नाना राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, इकबाल शेख, संजू बड़ोदिया, चालक पोलीस हवालदार मोनू शुक्ला, पोलीस अंमलदार निलेश इंगुलकर यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर